श्री साईनाथ प्रसन्न

# श्री साईलीला

मासिक पुस्तक

अंक २, वर्ष १ ] वैशाख [ शके १८४५

नलिनीदलगतजलमतितरलम् । तद्वज्जीवनमतिशय चपलम्



क्षणमपि सज्जनसंगतिरेका । भवति भवार्णव तरणे नौका

—शंकराचार्य.

संपादकः—रामचंद्र आत्माराम तर्खड.

# अनुक्रमणिका.


| | | |
|---|---|---|
| अनुभव | ... ... ... ... ... | १-८ |
| स्वप्नसृष्टि | ... ... ... ... ... | ९-२१ |
| श्रीदत्तचित्साईसद्गुरुभ्योनमः | ... ... ... | २२-३१ |
| श्रीसद्गुरुसाईनाथ प्रसन्न | ... ... ... ... | ३१-३२ |


## विनंति.

सुप्रसिद्ध श्री मोरोपंत कविकृत **केकावलि** या भक्तिरसप्रेमामृतानें ओथंबलेल्या काव्यावर कै. रा. ब. दादोबा पांडुरंग यांची "यशोदा पांडुरंगी" टीका जी साठ वर्षांपूर्वी छापून प्रसिद्ध झाली होती व आजमितीस अत्यंत दुर्मिळ झाली होती तिची दुसरी आवृत्ति छापून तयार झाली आहे. किं. रु. २.

कै. गोविंदराव रघुनाथ दाभोळकर यांचा सुप्रसिद्ध ओजस्वी व प्रासादिक श्रीसाईसच्चरित हा ग्रंथ बांधून तयार आहे. पानें अदमासें १००० किं. रु. २--८--०.

रा. आ. तर्खड.

व्यवस्थापक—श्रीसाई[illegible]ेरी.

## श्री साई भक्तांस विज्ञप्ति.

कोणाला श्री साईमहाराजांबद्दलचे त्यांचे स्वतःचे अनुभव श्री साई-लीलेंत प्रसिद्ध व्हावे म्हणून पाठविण्याचे असतील त्यांनीं तें आमचेकडे पाठविल्यास ते प्रसिद्ध होण्याबद्दल आदरपूर्वक योग्य तो विचार होईल.

रा. आ. तर्खड,

—प्रकाशक.

# अनुभव

## माझी समाधी बोलेल

ह्या वर्षाच्या श्रीरामनवमीच्या उत्सवासाठीं रा. ब. मोरेश्वरराव प्रधान, श्री सुंदरराव दि. नवलकर व त्यांचे दुसरे चिरंजीव, आणि लेखक, मंगळवार ता. १२ एप्रिलच्या रात्रीं नागपूर एक्स्प्रेसनें निघून दुसऱ्या दिवशीं शिरडीस पोंहचले. उत्सवापूर्वी दोन दिवस अगोदर गेल्यामुळें, संस्थानचें कामकाज पाहण्यास सवड झाली.

यंदाच्या उत्सवासाठीं मुंबई, अंधेरी, आणि गुंटाकल, सावंतवाडी वगैरे दूरदूरच्या ठिकाणाहून विशेषत: तरुण मंडळी आली होती आणि त्यांचा उत्साह व आस्था पाहून लेखकाचें मन रमलें.

लेखकानें आपल्या नित्यनेमाप्रमाणें स्नानानंतर श्रीसाईबाबांच्या अत्यंत पवित्र श्रीद्वारकामाईंत जाऊन श्रींच्या तसबिरीपुढें लोटांगण घालून कापूर व उदबत्ती लावून कांहीं वेळ तेथें स्वस्थ बसून श्रींच्या तसबिरीला प्रेमानें न्यहाळून, नंतर तेथल्या पेटींत कांहीं दक्षिणा ठेवून, पुन्हा साष्टांग नमस्कार घालून श्री धुणी माईंतली उदी कपाळाला लावून, प्रेमानें श्रींचा निरोप घेऊन तेथून श्रींच्या समाधिमंदिरांत जावें.

तेथें वरील प्रकारचा पुन्हा विधि करून शेवटीं श्रींच्या पादुकांवर माथें ठेवून, निरोप घेऊन नंतर इतर कामकाजाला लागावें, असा त्याचा नित्यक्रम असे.

श्री दासगणूंचीं अप्रतिम कीर्तनें होत असत. भोंदु साधूंच्या तावडींत न सांपडण्याविषयीं त्यांचा अत्यंत कळकळीचा उपदेश असे.

यंदा यात्रा विशेष भरली होती. त्या यात्रेंत फिरावें, श्रींच्या लेंडी बागेंत जावें, तेथें त्या निंबवृक्षद्वयांच्या छायेखालीं त्या नंदादीपाजवळ बसावें, श्री भाऊ कुंभारांची गांठ पडल्यास त्यांना भेटावें, असे आनंदांत त्यांचे दिवस जात होते.

हें मनाला कसेंसेंच वाटलें. अशा पवित्र पुरुषाच्या तोंडून भलभलते शब्द निघतील हें त्याला मुळींच संभवनीय वाटेना आणि असे शब्द आपल्याला अनुलक्षून अथवा इतर कुणालाही, आपल्या देखत, श्रीसाईबाबांना उच्चारतांना, अथवा मारामारादि प्रकार त्यांच्या हातून घडतांना, आणि जर प्रत्यक्ष पाहिला, तर त्याच क्षणीं मानसिक समाधान कायमचा ढळून परवानगी निरवानिरवी बाबांची न घेतां शिरडीहून निघून थेट घरीं जावयाचें, हा त्याच्या मनाचा पक्का निश्चय झाला होता. पण त्याप्रमाणें तो उघड केव्हांही देखील कोणा-पाशींही बोलला नाहीं.

हें लिहितांना हृदय उचंबळून येत आहे. डोळ्यांत अश्रु येऊन लिहा-वयास हरकत पडत आहे. धन्य त्या साईमाउलीची. लेखक अनेक वेळां शिरडीस दर्शनाला गेला होता. तासचे तास श्रींच्या पायांपाशीं बसला, पण त्या वेळांत एक अवाच्य शब्द अथवा क्रोधयुक्त कृति श्रींच्या हातून घडलेली लेखकाला दिसली नाहीं. काय निस्सीम प्रेम हें !

एके वेळीं बहुधा १९१३ चें साल असावें, वेळा फाल्गुनांतली होळीच्या आसपास, साठेसाहेबांच्या धर्मशाळेलगतच्या वाड्यांत, घोड्यासाठीं कीं पालखीसाठीं एक खोली करण्याचें कै. राधाकृष्णबाईनें ठरविलें, आणि त्यासाठीं पूर्वेच्या बाजूला ( त्या वेळीं समाधिमंदिर नव्हतें ) मातीच्या लाद्या करून त्या एकावर एक रचून त्यांचे खांब बनवावयाचे, व साठ्यांच्या वाड्याच्या भिंतीला भोंकें पाडून त्यांत वांसे घालून छप्पर बनवावयाचें आणि त्या छप्पराचा ढाळ आडवी तुळई टाकून त्या मातीच्या खांबल्यांवरून सोडावयाचा.

या कामावर राधाकृष्णबाईनें श्री. पुरंदरे याना नेमलें. बाबा लेंडीवर जावयाला निघाले त्या वेळीं पुरंदरे साठ्यांचा वाड्याच्या भिंतींना भोंकें पाड-ण्याच्या तयारींत होते. बाबा त्यांना खूप रागावले. लेखक त्या वेळीं विहिरीवर स्नानासाठीं गेला होता. तो परत आल्यावर त्याला ही हकीकत समजली. त्या गोष्टीचा त्याला उलगडा होईना. तो पुरंदऱ्यांना मदत करावयास तयार झाला. इतक्यांत बाबा लेंडीहून परत आले, पुरंदरे एका घडवंचीवर चढले होते. लेखक खालीं उभा होता आणि पुरंदऱ्यांना एक लहान पहार देण्याच्या तयारींत

होता. तेव्हां झालेला संवाद. (या संवादाची श्री. पुरंदरे यांना स्मृति आहे की नाहीं, पण लेखकाच्या स्मृतिवर त्याचा ठसा कायमचा बसला आहे.)

बाबा अत्यंत सौम्य शब्दांत म्हणाले, " भाऊ, हे तू काय करतोस ? "

" बाबा पुरंदऱ्यांना घोडयासाठीं खोली बांधण्याला मदत करतों. "

" पण पहार कशाला ? "

" साठेसाहेबांच्या वाड्याच्या भिंतीना भोकें पाडण्यासाठीं. "

" अरे ! अशीं भिंतींना भोकें पाडूं नये ! "

" कां बाबा ? वाडा तर आपलाच आहे ना ? "

" तें खरें ! अरे, पण पुढें फौजदारी होईल. "

" ती कां ? "

" तुला कळत नाहीं. "

हें भाषण श्रीसाईबाबांनीं किती तरी गोड शब्दांनीं केलें होतें !

पुरंदऱ्यांना भोकें पाडण्याच्या कामापासून निवृत्त करून सेवक नंतर दुसऱ्याच दिवशीं मुंबईस निघून आला.

बरें झालें, त्यावेळीं त्या भिंतीला भोकें पाडलीं नाहींत. तरी पण पुढें त्या वाडयासंबंधानें फिर्यादी, अर्ज्या, फौजदाऱ्या वगैरे सर्व कांहीं गोष्टी श्रीसाई-बाबांनीं भाकित केल्याप्रमाणें तीन चार वर्षांपूर्वी झाल्याच.

इतक्या विस्तारानें लिहावयाचें कारण कीं, लेखकाला श्रींच्या छबींतील मुद्रा वरील वर्णन केल्याप्रमाणें पूर्वी कधींही न दिसल्यामुळें त्याच्या उदासीनतेंत विशेष भर पडली.

तो जड पाउलांनीं रस्त्याकडे गेला. सकाळच्या अकरांचा सुमार होता. मोटार आली. भराभर चढून वीस माणसें आंत बसलीं. मोटर होती सोळा बैठकींची आणि वीस माणसांची भरती ! मोटरवाला मोटर चालवीना. इंदूरचे एक गृहस्थ होते ते उतरून मागाहून एक बस आली त्यांत बसून गेले. त्या बसनें जाण्यासही सवड होती परंतु कोणीही उतरेना. ती बस निघून गेली.

साडेअकरा झाले तेव्हां कंटाळा येऊन लेखक बसमधून उतरला. सामान उतरविलें तें घेऊन दीक्षीतवाडयांत जड पाउलानीं परत आला.

त्यानंतर त्या बसमधलीं तीन चार माणसें उतरलीं व मागाहून येणाऱ्या बसमध्यें बसून मनमाडास जाऊन संध्याकाळीं मुंबईला पोंहचलीं.

असो. लेखकानें आपलें सामान उतार्‍याच्या ठिकाणीं नेलें व तेथें तो स्वस्थ विचार करीत पड... असें कां होतें, काय चुकतें, मनाला ही अस्वस्थता कां ?

मुंबईंत कांहीं अनिष्ट प्रकार घडावयाचा असता तर त्याला पाहिजे तशा अडचणींतून पार पडून त्याच दिवशीं किंवा त्याच्यापूर्वीही श्रींनीं जाण्याची स्फूर्ति उत्पन्न करवून त्याप्रमाणें क्रियाही घडवून आणली असती, इतका त्याचा श्रींवर दृढ विश्वास. तेव्हां हें असें काय होत आहे हें त्याला कळेना.

ती रात्र त्यानें तळमळून काढली. दुसरा दिवस म्हणजे सोमवार ता. १८ एप्रिल हा होता. तो दिवस काल्याचा होता. नित्याप्रमाणें श्रीद्वारकामाईत श्रींच्या दर्शनाला गेला. श्रींची चर्या जरी आदल्या दिवसाप्रमाणें नव्हती तरी हमेशप्रमाणें प्रफुल्लित नव्हती. तिकडून येऊन समाधिमंदिरांत नित्य कार्यक्रम करून, तिकडच्या पेटींत नित्याप्रमाणें रकम टाकून, साष्टांग लोटांगण घालून, उठून श्रींच्या पादुकांवर मस्तक ठेवतांक्षणींच "अरे **माझा** सव्वा रुपया !" अशी स्मृति झाली.

अत्यंत आनंद वाटला. तात्काळ खिशांतून सव्वा रुपया काढून तो त्या समाधीच्या पेटींत टाकला. सर्व खिन्नता क्षणार्धामध्यें पार नाहींशी झाली. तसाच श्रीद्वारकामाईंत पुन्हा धांवत गेला. श्रींची चर्या अत्यंत आनंदांत दिसली. सर्व गोष्टींचा उलगडा झाला !!

हा सव्वा रुपाया काय व कसला ?

शिरडीस जाण्यासाठीं मुंबईहून निघते वेळीं, सुनबाईनें सव्वा रुपया पुढें ठेवला आणि म्हणाली कीं, 'हे पैसे श्रींच्या समाधीच्या पेटींत टाका.' तेव्हां झालेला संवाद:—

" पेटींत कशाला टाकावयाचा ? तो श्री. दास गणूकडे जाईल "

" जाईना का "

" पण उत्सवफंडाची पावती दिली तर श्रीरामनवमीच्या रिपोर्टांत तुझें नांव येईल. "

" मला नांव, प्रसिद्ध होण्याशीं काय करावयाचें आहे ? पैसे श्रीसाई-बाबांच्या चरणीं अर्पण व्हावे हीच इच्छा. "

ते पैसे लेखकानें खिशांत ठेवले. दररोज आपल्या नित्यक्रमाच्यावेळीं मात्र सुनेचा सव्वा रुपया समाधीच्या पेटींत टाकावयाला तो विसरत असे.

त्याच्या मनाची चलबिचलता वाढून, त्याच्या विसराळूपणाविषयीं क्रोध व खेदयुक्त मुद्रेनें रविवारीं निघण्यापूर्वीं त्याच्याकडे श्रीसाईमाऊलीनें श्रीद्वारकेंत पाहिलें; आणि तितक्यानेंही जेव्हां त्याला आठवण होईना तेव्हां त्याला जसें काय बसमधून खेंचून परत आणलें; व ठेवून घेतलें. त्या रात्रीं पण त्याला आठवण होईना, तेंव्हां त्याच्या मानसिक तळमळीची दया घेऊन श्रीसाई-माउलीनें आपल्या समाधींतल्या पादुकांपाशीं,

" अरे माझा सव्वा रुपया ! " अशी स्मृति दिली.

या स्मृतिमध्यें **माझा** या शब्दाचें माधुर्य पाहा.

आधुनिक विद्वान हें वाचून नाकें मुरडतील, आणि म्हणतील (" Oh ! this is mere imagination, it is the blabbering of an old man." ) हें सर्व काल्पनिक आहे आणि एका वृद्ध गृहस्थाची बडबड आहे.

असें त्यांना वाटणें साहजिक आहे. लेखकालाही पंचवीस तास पर्यंत असेंच वाटत असे, याची त्याला पूर्ण जाणीव आहे. आतां वयपरत्वें हा अनुभव वृथा वटवट कीं कसें हें ज्याचें त्यानें पहावयाचें आहे.

ही गोष्ट ज्यावेळीं घडली त्यावेळीं ती तेथें असलेल्या आपल्या मित्र-मंडळीस त्यानें सांगितली, आणि त्या गोष्टींच्या सत्यतेविषयीं त्यावेळीं त्याची चर्या त्यांना साक्ष देत असलीच पाहिजे.

" माझी समाध बोलेल " या श्रीसाईवाक्याचा, श्रींच्या आश्वासनाचा प्रत्यक्ष अनुभव आल्यावर आनंद कां वाटणार नाहीं बरें ?

प्रश्न आतां उद्भवतात कीं, समाधीवरच्या श्रींच्या पादुकांवर मस्तक ठेवतांना तेथेंच कां ही स्मृति जागृत व्हावी ? इतर ठिकाणीं कां होऊं नये ?

" माझा सव्वा रुपया " ही स्मृति काय दर्शविते ? हे श्रीसाईबाबांचे शब्द नव्हेत काय ? कां "बाबांचा सव्वा रुपया" अशी स्मृति झाली नाहीं ?

आतां शास्त्राधार घेऊन कोणी म्हणतील कीं अशा प्रकारचे अनुभव प्रसिद्ध करूं नयेत. तर तो शास्त्राधार खरा आहे. पण तो कोणाला ? ज्याची वृत्ति केवळ आत्मसाक्षात्कार करवून घेण्याकडे आहे त्यालाच. लेखकाची ही वृत्ति कधींही नव्हती.

आत्मसाक्षात्कार होवो न होवो. श्रींच्या पायांवर त्याची निष्ठा अचल राहावी हेंच त्याचें ध्येय. आणि अशा सद्गुरुच्या प्रेमाचे वर वर्णन केलेले दृष्टांत यांनीं अंतःकरण भरून येऊन कृतार्थ वाटून आपल्या गुरुमाउलीची ही लीला प्रसिद्ध करण्यांत त्याला साहजिकच आनंद वाटत आहे. कां ? तर या भाकडकथा नव्हेत. यांत काय अप्रतिम प्रेमाचा ठेवा आहे तो जनतेपुढें मांडून प्रत्येक व्यक्तिला आपल्या आंत काय अमर्याद सामर्थ्य आहे याची जाणीव उत्पन्न होऊन त्याचा विश्वास वाढून सध्यांचें त्याचें मानसिक दौर्बल्य त्यामुळें नष्ट होऊन त्याच्या हातून धडाडीचीं कृत्यें व्हावींत.

" माझी समाध बोलेल " या बाबांच्या शब्दांचा अनेकांना तरतऱ्हेनें अनुभव आलाच असला पाहिजे, आणि तो ज्यानें त्यानें लेखकाकडे प्रसिद्ध होण्यासाटीं जरूर पाठवून द्यावा अशी त्यांना सविनय प्रार्थना आहे.

बांद्रें,
ता. ५-५-३२.

} रा. आ. तर्खड.

# स्वप्नसृष्टि

श्रीयुत संपादक महाशय,

" श्रीसाईलीला " यांस, य.स.

सा. न. वि. वि. मागें आपणांकडे एका अनुभवजन्य स्वप्नाची हकीकत लिहून पाठविली होती. आज दुसऱ्या एका अशाच स्वप्नाची हकीकत लिहून पाठवीत आहें. या स्वप्नांतील शब्द फार तर सात-आठ असतील, परंतु तें स्वप्न पडण्यास परिस्थिति कशी उत्पन्न झाली होती, याचें पाल्हाळच विशेष आहे, आणि तें लिहिल्याशिवाय तर स्वप्नाचें रहस्य कळणार नाहीं; म्हणून तें लिहीत आहें.

मला सेवानिवृत्त होऊन सरासरी तेरा वर्षें झालीं, व मी कोंकणांत घरीं जाऊन राहिलों. चाकरी करीत असतांना व ती सोडल्यावर बरचा प्रपंच चालवून जी कांहीं पुंजी उरे, ती मुलांच्या मुंजींकरितां व त्यांच्या आणि मुलींच्या लग्नांकरितां खर्च होऊन जात असे. असें होतां होतां, एका मुलीचें लग्न व्हावयाचें राहिलें. गेल्या चार पांच वर्षांपासून मला अशी इच्छा होऊं लागली होती कीं, आतां घरदार सोडून एखाद्या क्षेत्राच्या ठिकाणीं जाऊन राहावें. परंतु सध्यांत धाकट्या मुलाचें शिक्षण पुरें झालें नसल्यामुळें मला तोंपर्यंत तोंव घर सोडून जातां येईना. मनांतील इच्छा अशी कीं, धाकट्या मुलाचें शिक्षण पुरें झाल्यावर त्याला वकिली करण्याकरितां घरीं ठेवावा व मग आपण एखाद्या क्षेत्राचे ठिकाणीं रहाण्यास जावें. ती इच्छा श्रीगुरुकृपेनें सफल झाली. धाकट्या मुलास घरीं ठेवून, मी तीन वर्षांपूर्वी आपल्या वृद्ध भावजयीस व धाकट्या मुलीस बरोबर घेऊन, वांईस रहावयास आलों. येथें हेंही सांगितलें पाहिजे कीं, माझी बायको निवर्तल्यावरच तावडतोब मी सेवानिवृत्त झालों. वांईस राहावयास येतांना मी घरांतील चीजवस्त कांहीं बरोबर आणिली नाहीं, व कांहीं अपरिहार्य कारणामुळें माझ्याजवळ जी थोडीबहुत शिलक होती तीही मला मिळाली ना

मिळून मी कफल्लक स्थितींतच वांईस राहण्यास आलों. वांईस आल्यानंतर आतां थाकटया मुलीचें लग्न कसें होतें, याची काळजी मला लागली. कारण तेवढयाच एका पाशांतून मला मोकळें व्हावयाचें होतें. शके १८५१ चा कार्तिक महिना आला आणि मी वर शोधण्यास सुरुवात केली. एका ठिकाणीं पत्रिका जुळली नाहीं, व दुसऱ्या ठिकाणीं "यंदा लग्न कर्तव्य नाहीं," असा जवाब मिळाला. आणखीही दुसरी एक काळजी अंतःकरणांत डोकावत होती, ती कांहीं केल्या कमी होईना. ती काळजी म्हणजे, जर यदाकदाचित् एखादें स्थळ पसंत पडून मुलीच्या लग्नाचा योग जुळून आला तर, हुंडयापांडयाला व लग्नाच्या खर्चाकरितां लागणारें द्रव्य कसें व कोठून मिळवावें? मला ऋण काढून लग्न करणें पसंत नव्हतें. कारण ऋण काढलें तर अल्प पेन्शनांत नेहमींचा चरितार्थ चालवून हप्तेबंदी करून तें फेडण्यास कितीं तरी वर्षें लागावयाचीं, व तें फेडण्याच्या आंतच माझा अंत झाल्यास मुलांस कर्जाच्या पंकांत लोळत ठेवावयाचें, असें झालें असतें. परंतु तें टाळण्यास मार्ग कांहीं सुचेना. मात्र श्रीगुरुचरणीं दृढ श्रद्धा व विश्वास असल्यामुळें मनाला मोठा धीर होता कीं, या बिकट परिस्थितींतूनही श्रीगुरु आपल्याला वांचवतील. अशा तऱ्हेचे विचार नेहमीं मनांत घोळतच असत. इतक्यांत मार्गशीर्ष महिनाही संपला. नंतर कांहीं दिवसांनीं एका रात्रीं नित्याप्रमाणें मी झोंपी गेलों, व पहांटेच्या सुमारास जागा झालों. जागा झाल्यावरही लग्नाच्या खर्चाबद्दलचेच विचार माझ्या मनांत सारखे घोळत होते. पुन्हां कांहीं वेळानें माझा डोळा लागला, व तेवढया अवकाशांत मला खालीं लिहिल्याप्रमाणें स्वप्न पडलें.

## स्वप्न

कोणी तरी बोलतो आहे. आकृति मात्र दिसत नाहीं. आवाज स्पष्ट ऐकूं येत आहे कीं, "पैसा ज्याचा त्याच्याजवळच आहे. शोधला म्हणजे मिळतो." हे शब्द ऐकून कोण बोलतो आहे हें पाहाण्याचा प्रयत्न करीत असतांच मी जागा झालों. या स्वप्नाची भाषा मात्र श्रीबाबांच्या भाषेसारखी वाटली.

स्वप्न पाहिल्यानंतर मनाची चमत्कारिक स्थिति झाली आणि हें काय गूढ आहे, याचा मी विचार करूं लागलों. कोणी अदृश्य शक्ति लग्नाच्या खर्चाकरितां पैसा कोठून मिळवावा हें सांगून गेली काय ? किंवा नेहमींच्या विचारामुळें ह्या नुसता भास झाला असावा असा विचार करतां करतां माझ्या डोक्यांत एक विचार आला तोच या स्वप्नाचा अर्थ असला पाहिजे असा निश्चय कायम झाला. सरकारचा असा एक नियम आहे कीं, कोणी नोकरानें पेन्शन घेतलें म्हणजे त्या पेन्शनच्या रकमेपैकीं कांहीं रक्कम त्यानें दरमहा कमी घेण्याचें ठरविल्यास, सरकार त्याला त्या रकमेबद्दल एकदम एक मोठी रक्कम देतें, व ती रक्कम त्यानें मुलांच्या लग्नकार्यास, घर बांधण्यास, शेतभात विकत घेण्यास अगर मुलांचे शिक्षणाप्रीत्यर्थ खर्च करावी. अशी रक्कम मी त्यावेळपर्यंत घेतली नव्हती. तेव्हां अशी रक्कम घेण्याबद्दलच हें स्वप्न स्पष्ट आहे, अशी माझी खात्री झाली. मला अशा तऱ्हेचें पुढें संकट येणार आहे, हें श्रीगुरुमहाराजांना माहीत असल्यामुळेंच मला अशी रक्कम पूर्वी घेण्याची बुद्धि त्यांनीं दिली नाहीं. नाहीं तर ह्या रकमेचीही गतिही माझ्या शिल्लकेच्या रकमेप्रमाणेंच झाली असती, असें मनांत येऊन श्रीगुरुमहाराजांनीं मला माझ्या संकटप्रसंगीं मार्ग दाखवून माझें संकट कसें निवारण केलें, याबद्दल अतिशय कौतुक वाटलें आणि श्रीगुरुमहाराजांना मी किती धन्यवाद दिले त्याचें वर्णन करणें अशक्य आहे.

वर लिहिल्याप्रमाणें मनाचा निश्चय झाल्यावर मग काय उशीर ! तावडतोब कागद, शाई वगैरे लिहिण्याची सामग्री घेऊन वर निर्दिष्ट केलेली पेन्शनची रक्कम मिळण्याविषयीं अर्ज केला. त्यासंबंधाचा पत्रव्यवहार होऊन तीन महिन्याच्या आंत लग्नाच्या खर्चाला पुरेल इतकी रक्कम मिळाली. लागलाच दुसराही योग जुळून आला. येथेंच एक स्थळ आढळलें. एका स्नेह्यामार्फत माझ्या मुलीचें टिपण मुलाच्या वडिलांस दिलें. टिपण जमल्याचें एकदोन दिवसांत समजलें. पुढचें सर्व बोलणेंचालणें होऊन ता. २ मे १९३० रोजीं मुलीचें लग्नही झालें. म्हणजे मला रक्कम मिळाल्यापासून अवघ्या २० दिवसांतच

मुलीचें लग्न झालें व मी निष्काळजी झालों. झाले. संपादकमहाशय, माझे स्वप्नाची हकीकत संपली.

वर लिहिलेल्या हकीकतीवरून "मनीं वसे तें स्वप्नीं दिसे" या म्हणीचा या स्वप्नास वास येतोसा दिसतो. पण असा वास येणें सहाजिकच आहे. कारण कोणत्याही गोष्टीचा निदिध्यास लागल्याशिवाय मनाची एकाग्रता होणें शक्य नाहीं, आणि अशा रीतीनें मनाचें आत्म्याशीं ऐक्य झाल्यावांचून वर लिहिल्याप्रमाणें अचूक मार्गदर्शक ईश्वरी संदेश येणें संभवत नाहीं. म्हणून या स्वप्नास, स्वप्न म्हणावें किंवा काय, असा संशय येतो. कारण स्वप्न म्हणजे मिथ्या, असा सार्वत्रिक समज आहे. परंतु येथें पाहावें तों या स्वप्नानें नेमका मार्ग दाखवून केवढें तरी प्रत्यक्ष कार्य केलें आहे. तेव्हां मला वाटतें कीं, एकाच गोष्टीची मनाला सारखी तळमळ लागली असली म्हणजे कांहीं कालानें संकल्पविकल्पादिक सर्व वृत्तींचा लोप होऊन मनाची एकाग्रता होत असावी, आणि मनाचें आत्म्याशीं, आपल्या नकळत, एक क्षणभरच कां होईना. ऐक्य झालें म्हणजे अशा तऱ्हेचा आत्मसाक्षात्कार होत असावा. कारण. आत्मा सर्वव्यापी आहे, आणि त्याला भूत, वर्तमान व भविष्य सर्व कळतें. नंतर त्या साक्षात्काराचा संदेश श्रीगुरुमुखानें स्वप्नाच्या द्वारें आपल्या प्रचीतीस येत असावा. माझी समजूत मीं लिहिली आहे. परंतु श्रीबाबांच्या अनेक भक्तांपैकीं एकाधा ज्ञानी भक्तवर्यानें या गोष्टीवर अधिक प्रकाश पाडावा अशी इच्छा आहे; म्हणजे त्या योगानें कांहीं स्वप्नाचेच नेमके अनुभव कां येतात, हें गूढ उकलण्यास विशेष मदत होईल. कळावें हे विज्ञापना.

मुक्काम वांई,
ता. २७ मार्च १९३२.

आपला नम्र,
**श्रीदत्तसेवक व श्रीबाबांचा भक्त.**

# श्रीदत्तचित्साइ सद्गुरुभ्योनमः

## सत्य स्वप्नें व त्यांवर सुचलेले विचार

कृतानेक शिरसाष्टांग नमस्कार वि. वि.

श्रीसाइलीलेच्या पौष-माघ या जोड अंकांतील " स्वप्नसृष्टि " या शीर्षकाखालीं आपला जो सुंदर लेख आला आहे व ज्यास अखंड विद्या-व्यासंगी व विद्याप्रेमी रावबहादुर चिंतामणराव विनायक ऊर्फ नानासाहेब वैद्य या मार्मिक विद्वद्वर्य सज्जनाकडून पुष्टी मिळाली आहे तो वाचून फार आनंद झाला.

आमचे घरीं माझ्या वडिलांस, माझ्या दोघां वडील बंधूंस, मला स्वतःला, व माझ्या धाकट्या दोघां बंधूंस, म्हणजे सर्वांसच लहानपणापासून हा स्वप्नाचा नाद. आमचीं स्वप्नें खरीं झालेलीं आहेत व होतातही.

स्वप्नशास्त्र आहे म्हणून म्हणतात. पण तें आमच्या परिचयाचें नाहीं आम्हीं कोणीही त्याचा अभ्यास केला नाहीं.

आमचा सर्वांचा परमात्मावर भरंवसा. पण परमात्मा म्हणजे काय केवढा व कसा याचें ज्ञान नाहीं. वरांतील पुरातन कालापासून ज्या देवांची आम्ही पूजा करतों व ज्यांना आम्ही " स्वामी " म्हणून म्हणतों किंवा ज्यांना " श्रीसमर्थ सद्गुरु साइबाबा " म्हणून म्हणतों, तेच आमचे परमात्मा. परमात्मा कोणी का असेनात, जे या कष्टमय संसारांत आमच्या हाकेस " ओ " देणारे, संसारांतील विशिष्ट लाभहानीची, वेळींच किंवा अगाऊ स्वाप्निक सांकेतिक खुणेने सूचना देणारे, किंवा संसारांत राहून प्रत्यक्ष अथवा स्वप्नांत परमार्थाचे पाठ देऊन, पाठ कसे गिरवले जातात याची मधून मधून चाचणी पाहाणारे, चुकीच्या ठिकाणीं दुरुस्ती करून देणारे, कष्टमय संसार सुखमय करून देणारे, व शेवटीं अंतिम ध्येयास नेऊन पोंचविणारे, ते आमचे परमात्मा

माझ्या वडिलांवर सद्गुरुकृपा कशी व केव्हां झाली, भावी आपत्ति केव्हां येणार, कशी टळणार, गुंतागुंतीच्या बिकट प्रश्नांचा निकाल केव्हां व

कसा लागणार यासंबंधानें त्यांना पडलेलीं व खरी झालेलीं कांहीं मजेदार स्वप्नें मला माहीत आहेत. परंतु तीं माझ्या प्रत्यक्ष अनुभवाचीं नसल्यामुळें तीं मी येथें देत नाहीं. परंतु आपल्यास वचन दिल्याप्रमाणें माझीं खरीं झालेलीं व जीं मी त्याच वेळीं टिपून ठेविलेलीं त्यांपैकीं कांहीं स्वप्नें येथें देतों.

सन १९०० सालांत मी प्रथम रेव्हिन्यु खात्यांतील हायर स्टँडर्डचे परीक्षेस बसलों. त्यावेळीं मी वसईस अवल कारकून असून मला मूलबाळ कांहीं झालें नव्हतें. फक्त मी व कुटुंब अशीं दोघेंच होतों. बाजारांत फडणिसांचे वाड्यांत दुसरे मजल्यावर दोन खोल्यांत रहात होतों. परीक्षेचा निकाल लागण्याचे आदले दिवशीं रात्रीं सुमारे ३ वाजतां मला एक स्वप्न पडलें. स्वप्नांत मामलेदार कचेरींतील एक शिपाई सरकारी आठवड्याचें ग्यॅझिट घेऊन मजकडे आला. त्यास मीं विचारिलें "कीं, ग्याझिटांत काय आहे ?" तो म्हणाला, "तुमचें नांव नाहीं." मी रागावलों व म्हणालों कीं, "तुला इंग्रजी येतें कीं काय ?" तो म्हणाला, "नाहीं." "मग ग्यझिटांत माझें नांव आहे किंवा नाहीं हें तुला कसें कळलें ?" तो म्हणाला, "गोविंदराव पटवर्धनांकडून मीं तें वाचून घेतलें." (गोविंदराव पटवर्धन त्या वेळीं मामलेदार कचेरींत माझे हाताखालीं जबाबी कारकून होते ही गोष्ट खरी.) इतक्यांत मी जागा झालों व कुटुंबास जागें करून त्यांना म्हणालों, " अहो, मीं नापास झालों; त्या म्हणाल्या, "काय, सकाळचें ग्याझिट आतांच आलें कीं काय ?" मी म्हणालों, "तसें नाहीं मला स्वप्न पडलें." व मी त्यांना सांगितलें. दोघांच्या मनाला वाईट तर वाटलेंच परंतु उपयोग काय ! नंतर कांहीं वेळानें आम्ही दोघेंही झोंपी गेलों; मला पुन्हा पहाटेस ५, ५॥ वाजण्याचे सुमारास दुसरें स्वप्न पडलें कीं, मी मुंबईच्या सेक्रेटरियटच्या आफिसांत गेलों व तेथील एका कारकुनास विचारिलें कीं, माझ्या परीक्षेचा निकाल काय झाला ? त्यानें कांहीं कागद वाचून मला सांगितलें कीं, तुमची परीक्षा पास आहे. मी म्हणालों, " माझ्या एका स्नेह्याचा निकाल पाहा बरें." " तो म्हणाला, तुम्हास ही पंचाइत कशाला पाहिजे ?" मी म्हणालों, "सांगा तर खरें." नंतर त्यानें पुन्हा कागद चाळून

म्हटलें कीं, तोही पास झाला आहे. इतकें ऐकून जागा झालों. पुन्हा कुटुंबास जागें केलें व हें स्वप्न सांगून पुढचे सहामाहीचे परीक्षेंत मी खात्रीनें पास होईन असें सांगितलें. सकाळीं ग्याझिट घेऊन शिपाई आला. तर खरोखरच त्यांत माझें नांव नव्हतें !

नंतर १९०१ सालीं मी पुन्हा हायर स्टँडर्डचे परीक्षेस बसलों. त्यावेळीं मला मोखाडयास अवल कारकून नेमलें होतें. तेथें परीक्षेच्या निकालाचे ग्याझीट येण्याचे आधले दिवशीं मला एक स्वप्न पडलें कीं, माझ्या मामे-आत्याबाईचे थोरले चिरंजीव गणपतराव जावळेकर ज्यांना मी दादा म्हणून म्हणत असें, ते मजकडे आले. त्यांना मी म्हणालों, 'दादा, तुला मीं पत्र लिहिलें त्याचें तूं उत्तरसुद्धां पाठविलें नाहींस.' तो म्हणाला 'पूर्वींच पाठविलें.' मी म्हटलें 'मला पोंचलें नाहीं, पण तें असो. तूंच येथें आतां स्वतः आला आहेस, तर सांग काय म्हणता परीक्षेचा निकाल आला तो.' तो म्हणाला, 'काय देशील ?' 'तूं प्रथम सांग तर खरा' असें मी म्हणालों. 'काय देशील तें प्रथम तूंच सांग' असा त्यानें आग्रह धरिला. मी म्हणालों, 'तूं मागशील तें देईन.' तो म्हणाला, 'मी काय सांगणार ? यावरून तुला समजत नाहीं का ?' मी म्हटलें, 'मला समजत नाहीं; स्पष्ट सांग' तो म्हणाला, 'तूं पास आहेस.' मी विचारलें, 'माझा नंबर कितवा व लिमयांचा कितवा ?' (यावेळीं मजबरोबर श्री. कै. केरोपंतनाना छत्रे, पुणें, डेक्कन कालेजांतील गणिताचे प्रोफेसर यांचे जामात श्री. दत्तोपंत लिमये हायर स्टँडर्डच्या परीक्षेस होते. मी पुण्यास केरोपंतनानांचे चिरंजीव श्री. कोंडोपंत छत्रे यांचे घरीं दत्तोपंत लिमये यांच्या ओळखीनें उतरलों होतों. त्या वेळीं हायरची परीक्षा पुण्यास होती. पहिल्या साहामाहीच्या वेळीं मी व दत्तोपंत एकाच खोलींत मुंबईस अभ्यास करीत होतों.) तो म्हणाला, 'तुझा पांचवा व लिमयांचा सहावा. हां, आतां तूं मला काय देशील ?' मी म्हणालों, 'तूं सांगशील तें.' तो म्हणाला, 'मला एक सत्यनारायण पाहिजे.' मोठा सत्यनारायण पाहिजे. सर्व गांव प्रसादास आला पाहिजे. मी म्हणालों, 'बरें तसें करीन.' नंतर मी जागा झालों व स्वप्न कुटुंबास सांगितलें व आम्ही उभयतां

ग्यॅझीटची वाट पहात बसलों. सकाळीं ८-९ चे सुमारास ग्यॅझिट आलें वा चमत्कार हा कीं, ग्यॅझिटांत पाहातों तों मी व लिमये दोघे पास होऊन माझा नंबर ५ वा व दत्तोपंतांचा नंबर ६ वाच होता.

आतां मोठा सत्यनारायण तर केलाच पाहिजे हें नक्की ठरलें. पण सत्यनारायण केव्हां म्हणजे कोणत्या वारीं करावा याबद्दल मी व माझें कुटुंब, यांच्यांत मतभेद होऊं लागला. मोखाडे हें अगदीं खेडेगांव व त्यावेळीं तर तेथें एक पैशाचाही जिन्नस मिळत नसे. कांहीं जिन्नस पाहिजे असेल तर तो घोटी, कासारा किंवा जव्हारहून आणवावा लागे. गुरुवारचें ग्यझिट मोखाडयास शनिवारीं येतें. कुटुंब म्हणें कीं सत्यनारायण ताबडतोब मंगळवारींच करावा. मी म्हणें घोटीहून किंवा कासाऱ्याहून किंवा जव्हारहून जिन्नस येण्यास बराच अवधि लागेल, करितां सत्यनारायण शुक्रवारीं करावा. व या दिवसाखेरीज तिसरा दिवस कोणासच पसंत पडेना. सरतेशेवटीं तो दिवस तसाच वाटाघाटींत जाऊन कांहींएक न ठरतां आम्हीं उभयतां रात्रीं जेवण करून झोपीं गेलों. त्याच रात्रीं मला पुन्हा स्वप्न पडलें कीं, एक ब्राह्मण वर्णानें काळा-सांवळा, पंचा नेसलेला हातांत पळी-पंचपात्री घेऊन आला व म्हणूं लागला कीं, 'कायरे, मंगळवार व शुक्रवार यासाठीं का भांडत बसलां आहांत? मला तुमचा मंगळवारही नको व शुक्रवारही नको. शनिवार पाहिजे मी जागा झालों. कुटुंबास स्वप्न सांगितलें. आमची उभयतांची खात्री झाली कीं, परमात्म्यास सत्यनारायण शनिवारीं पाहिजे आहे. मग आम्हीं सत्यनारायण शनवारींच केला. आम्हांस गांवातील सर्व मंडळींनीं मोडून काढिलें कीं सत्यनारायण शनिवारीं करण्याचें कोठून काढिलेंत? आम्ही त्यांस हें स्वप्न सांगितल्यावर त्यांनाही स्वप्नाचें मोठें कौतुक व नवल वाटलें, व आमच्या शनिवारास कोणीं नांवें न ठेवतां उलट आम्हांस हरएक बाबतींत मदत करून सर्व गांवकरी मोठया आनंदानें सत्यनारायणाच्या कथेस व प्रसादास आले. याचप्रमाणें सत्यतेस व प्रत्यक्ष अनुभवास आलेलीं मजजवळ माझीं स्वतःचीं अशीं वरींचशीं व्यावहारिक व पारमार्थिक स्वप्नें आहेत. त्यांपैकीं वर फक्त तीनच दिलीं आहेत. मला वाटतें तूर्त इतकींच पुरे.

हीं तिन्ही स्वप्नें व्यावहारिक आहेत व हीं मी श्रीक्षेत्र शिरडीस जाऊं लागण्याच्यापूर्वींचीं आहेत. मी शिरडीस सन १९११ सालापासून जाऊं लागलों. यानंतरचीं बाबांच्या संबंधाचीं पारमार्थिक सत्यस्वप्नें अत्यंत आनंदकारक व मनन करण्यासारखीं चुकांच्या दुरुस्तीचीं व शिकवणुकीचीं आहेत. त्यांची आठवण झाली म्हणजे अनुपमेय आनंद होतो, तो इतका की, तो सांगतांच येत नाहीं.

असो. व्यवहारांत व वेदांतांत स्वप्न मिथ्याच मानिलें आहे, परन्तु ज्या स्वप्नांची सत्यता प्रत्यक्ष जागृतावस्थेंत प्रत्ययास येते त्यांची वाट काय ? त्यांनाही मिथ्याच म्हणावयाचें कीं काय ? त्यांना मिथ्या म्हणणें म्हणजे सूर्यास सूर्य न म्हणण्यासारखेंच आहे ! एक दिवस कल्याणास जाऊन मी ही शंका कै. नानासाहेब चांदोरकरांना विचारली. ते म्हणाले, 'मला कधीं अशीं स्वप्नें पडत नाहींत; पडलींच तर मी तीं ध्यानांत ठेवीत नाहीं व ध्यानांत राहिलीं तर तीं खरीं झाल्याचें मला आठवत नाहीं; तथापि तुम्ही म्हणतां याचा विचार आपण रात्रीं जेवण झाल्यावर करूं.' आमचें जेवणखाण झाल्यावर आम्ही दोघे गाडीवर निजावयास गेलों व आपापल्या बिछान्यावर निजलों. त्याच गाडींत बाबांचा मोठा फोटो टेबलावर ठेवलेला होता व त्याचेजवळ दिवा जळत होता. नानासाहेब म्हणाले, 'तुमच्या शंकेचें निरसन आतां काय होईल तें पाहूं. चला निजूं.' आम्ही निजलों. पहांटे ४—४॥ चे सुमारास नानासाहेब उठले, व मला म्हणाले, 'उठा;' तुमच्या शंकेचें निरसन झालें. महाराज स्वप्नांत आले व म्हणाले अरे यांत अवघड काय आहे ? अरण्यांत जीं झाडें असतात तीं जात्या सुवासिक व रम्य फुलांचीं, स्वादु व रुचकर फळांचीं नसतात; परंतु त्यांत कांहीं झाडें सुगंधित व सुंदर पुष्पांचीं असून कांहीं मिष्ट व गोड फळांचीं असत नाहींत का ? तद्वत् स्वप्न तर खोटेंच, पण त्यांत कांहीं कांहीं वरील न्यायाप्रमाणें खरीं होतात. जीं खरीं होतात तीं खरींच. पण अपवादात्मक. जीं प्रत्यक्ष अनुभवास येतात त्यांस खोटें म्हणतां येणार नाहीं.'

वरील विवेचनावरून असें दिसून येतें कीं, अनुभवानें सत्यता पटवून देणारीं स्वप्नें सर्वांसच पडत नाहींत व ज्यांना पडतात त्यांना रोज रोजही

पडत नाहींत. क्वचित् प्रसंगींच पडतात. अशा प्रकारचीं स्वप्नें भविष्यकथन करतात. चित्तांतून रज व तम या गुणद्वयांची पूर्ण हकालपट्टी होऊन त्या ठिकाणीं सत्वगुणाचें साम्राज्य झाल्यावांचून कोणत्याही स्त्रीपुरुषास भविष्य कथन करण्याची पात्रता येऊन त्याचे वाचेस सत्यता येणें शक्य नाहीं. अशा तऱ्हेची भविष्यकथन करणारी वाचा सत्यतेचीं चालतीं बोलतीं उदाहरणें म्हणजे एक साधुसंतच. ते नेहमींच जागृति, स्वप्न, सुषुप्ति, तुर्या व उन्मनी या अवस्थांच्या पलीकडे असून अद्वितीय अशा निर्गुण परमात्म्याची सत्ता जीवास भासमान करून देणाऱ्या कलांचे सम्राट होत.

परन्तु प्रश्न हा आहे कीं, ज्यांचे चित्तांतून रज तमांचा झाडा झाला नाहीं व ज्याचें चित्त सत्त्वगुणानेंही विशेष विकसित झालें नाहीं, अशा साधारण स्त्री-पुरुषांना स्वप्नें पडून क्वचित् अथवा बहुतेक प्रसंगीं त्यांची सत्यता जागृतावस्थेंत तंतोतंत अनुभवास येते. अशा स्त्री-पुरुषांस स्वप्नांत भिन्न भिन्न वेशांत दर्शन देऊन भविष्य कथन करणारी, उपदेश करून पारमार्थिक विषयांत उन्नतीचा मार्ग दर्शविणारी, मार्गाचरणांत चूक होऊं लागली किंवा चित्त शंकित किंवा व्यग्र होऊं लागलें तर त्यास ताळ्यावर आणणारी ही व्यक्ती कोण ! अज्ञानी जीवाला ही शक्ति असणें असंभवनीय. निःसंशय, निरुपाधिक, शुद्ध चैतन्य शिवाचीच ती सत्ता आहे. जीव व शिव यापेक्षां परमात्मा ही निराळीच वस्तु आहे. आतां विश्वव्यापी परमात्म वस्तु जर एकच आहे तर मग जीव, व परमात्मा ही त्रयी निर्माण तरी झाली कोठून ?

नाटकांत एकच व्यक्ति जशी निरनिराळ्या वेळीं भिन्न भिन्न कमीअधिक अधिकाराच्या भूमिका घेते, तद्वतच ही परमात्मवस्तु एकाच वेळीं जीव शिव व परमात्मा अशा निरनिराळ्या—भूमिका घेऊन या विश्व-रंगभूमीवर जीवास, जागृतावस्थेंत साधुसंत वेषांत, स्वप्नांत शिव वेषांत व सुषुप्तींत परमात्म स्वरूपांत दर्शन देतें.

सोपाधिक जीवाला परम भाग्यानें पूर्व पुण्याईमुळें व सत्वगुणाधिक्यामुळें निर्गुण परमात्माचे मूर्तिमंत ठसे जे सगुणावतार संत त्यांचे जागृतींतदर्शन

होतें. सोपाधिक पण ईश्वरविषयक सत्वगुणविशिष्ट चिंताग्रस्त मनास निद्रावस्थेंत शिवदर्शन होतें, व निर्विषय जीवास सुषुप्तावस्थेंत परमात्म दर्शन होतें. —प्रत्येक जीवास नित्य सुषुप्तावस्थेचा थोडा तरी उपभोग घेण्यास मिळतोच. पण त्यांत त्यास जें परमात्मदर्शन होतें, त्याचें स्मरण त्यास राहात नाहीं; परंतु तो जागा झाल्यावर त्यास जी एक प्रकारची अप्रतिम व विलक्षण हुशारी वाटते व कोणताही बाह्य **प्रिय विषय** सेवन केल्यावांचून कांहीं काळपर्यंत सुख होतें व चित्त प्रसन्न राहातें व ज्याचें कारण त्यास सांगतां येत नाहीं तो खात्रीनें विमल व विशुद्ध चिद्घन परमात्मदर्शनाचाच परिणाम होय. साधुदर्शनाचा आनंद जागृतींत, शिवदर्शनाचा आनंद स्वप्नकालीं व परमात्मदर्शनाचा आनंद सुषुप्तावस्थेनंतर जागृतींत, असें अनुभवास येतें. सुषुप्तावस्थेंत मन निर्विकल्प झाल्यामुळें उदान वायूच्या सहाय्यानें जीव परमात्मदर्शनाचा लाभ घेऊन निर्गुण परमात्माचे ठिकाणीं त्या अवस्थेपुरता समरस होतो, व आत्मसुखाचा अनुभव घेतो, व गायन संपल्यावर आपण जसे कांहीं काळपर्यंत कानांत गुणगुणणाऱ्या गायनाच्या मंजुळ, मधुर व गोड सुरध्वनींचा आस्वाद घेत असतों त्याप्रमाणें जीवही सुषुप्तावस्थेंतून जागा झाल्यावर तो कांहीं काळपर्यंत परमात्मदर्शनसुखाचा म्हणजे अनुपमेय आत्मसुखाचा अनुभव घेतो. फरक इतकाच कीं, गायनसुरांची त्यास स्मृति असते व परमात्मदर्शनाची स्मृती नसते. ज्ञानी पुरुषांस सुषुप्तावस्थेचा यथेच्छ उपभोग मिळतो व त्यास परमात्मदर्शनाची स्मृतीही असते.

प्रत्येक जीवास कधीकाळीं संतदर्शन, केव्हां केव्हां शिवदर्शन व नित्य पण कमी अधिक प्रमाणांत निर्गुण परमात्मदर्शन होतें. म्हणून त्याचा जीवितक्रम त्यास कंटाळवाणा न होतां त्याचें आयुष्य त्यास सुखावह होतें. व असें जर न होईल तर त्याचें आयुष्य त्यास नकोसेंच होईल.

यावरून असें दिसतें कीं, परमात्मावर व सद्गुरूवर अत्यंत निष्ठा व पूर्ण श्रद्धा असून अंतःकरण चतुर्थ भक्तियुक्त व अनन्यगतिक असल्यामुळें, अहर्निश सत्संगति व सद्विचार यांत मन घोळत असल्यामुळें, रजतमांचा तिटकारा येऊन अथवा त्यांचेवर प्रभुत्व संपादन करून सत्वगुणवर्धनाकडे

पुष्कळ अंशीं चित्ताचा कल असल्यामुळें परमगुरु सोपाधिक जीवाची ( अज्ञानाची ) भूमिका संभाळून निरुपाधिक शिवाची भूमिका स्वप्नावस्थेपुरतीं पत्करून जीवास भिन्न स्वरूपांत शिवरूपानें दर्शन देऊन जीवास स्वप्न सत्यता पटवून देतात. सुषुप्तावस्थेंत चैतन्यघन परमात्मा शांत व सत्यस्वरूपाची भूमिका घेऊन जीवास दर्शन देऊन त्यास तावडतोब त्या अवस्थेपुरतें निर्विषय व निरुपाधिक करून, आपल्या स्वस्वरूपांत लीन करून घेऊन त्यास कांहीं काळपर्यंत आत्मसुखाचा लाभ करून देतात.

सूर्यकुलोत्पन्न गार्ग्यगोत्रसंभूत ऋषिकुमारानें प्रश्नोपनिषदांत महर्षि श्रीपिप्पलादाचार्यांना जो चतुर्थ प्रश्न केला आहे व त्यास महर्षि श्रीआचार्यांनीं जें उत्तर दिलें आहे त्यावरूनही वरील गोष्टींची सत्यता दिसून येते, असें माझ्या अल्प बुद्धीस वाटतें.

जागृतावस्थेंत संतदर्शनानंद व त्यांची वाचासत्यता, स्वप्नांत शिवदर्शनानंद व जागृतींत स्वप्नसत्यता व सुषुप्तावस्थेंत परमात्मदर्शनानंद व जागृतींत दर्शनपरिणामसुखानुभव, या तीन गोष्टींवरून परमात्म्याचें अस्तित्व कबूल करून जीव शिव व परमात्मा यांचा नित्य संबंध आहे असें मानणें भाग पडतें. यास इतर प्रमाणांची जरूरच दिसत नाहीं. स्वप्नसत्यतेवरून परमात्मास्तित्व व परमात्मदर्शन विषयावर चांगलाच प्रकाश पडतो असें मला वाटतें.

बाबांच्यासंबंधाचे स्वप्नानुभव बाबांच्या अनंत भक्तां... रोजदिवस येत आहेत. पूर्वीं आलेले असे पुष्कळ अनुभव ...साईलीलेंत पूर्वीं प्रसिद्ध झाले आहेत व हल्लींही नित्य प्रसिद्ध होत आहेत. अशा भक्तांनीं व इतर सद्गृहस्थांनीं व वाचकवृंदांनीं वरील विवेचनाचा सूक्ष्म रीतीनें विचार करावा अशी त्यांना माझी सविनय प्रार्थना आहे.

गाढ निद्रा, स्वप्नावस्थेच्या नंतर किंवा पूर्वीं केव्हांही येते. त्याबद्दल कोणत्याही प्रकारचा नियम सांगतां येत नाहीं. पहांटे किंवा पहांटेनंतर पडलेल्या स्वप्नाची सत्यता लवकर अनुभवास येते. पहांटेपूर्वीं पडलेल्या स्वप्नाच्या सत्यतेस बराच कालावधि लागतो. कित्येक स्वप्नें दुसरेच दिवशीं किंवा आठ-

पंधरा दिवसांत किंवा महिन्यांत भविष्यकथनानुभव देतात, कित्येक महिन्यांनंतर देतात, व कित्येक तर दोन–तीन वर्षांनींही देतात, असा स्वतःचा अनुभव आहे व अजूनही मला तो नाद आहेच, व माझा त्य पूर्ण भरंवसा आहे. श्रीबाबांच्यासंबंधानें पडलेलीं व खरा झालेलीं मजज बरींच स्वप्नें आहेत त्यांपैकीं एक सुंदर स्वप्न मी श्रीसाइलीलेच्या व अंकांत पूर्वीच प्रसिद्ध केलें आहे.

ब्रह्मांडचित्रपटावर एकाच काळीं जीव, शिव, गुरु, शिष्य, देव, शिव, शक्ति, आदिकरून भिन्नभिन्न भूमिका घेऊन आपल्या अगाध लील जगतास थक्क करून सोडणाऱ्या विश्वैक नट श्रीमोहनीराजबाबांचे पु चरणकंजांवर हें अष्टपत्री वास्तुलसीदल अनन्य भावानें अर्पण करून आ रजा घेतों.

ठाणें,
१७-३-३३ गुरुवार.

बाबांचें बाळ.

## श्रीदत्तचित्साईगुरुभ्योनमः

श्रीसाईलीला संपादक महाशय यांस—

प्रेमपूर्वक कृतानेक शि. सा. नमस्कार वि. वि.

शके १८५४ च्या म्हणजे नूतन संवत्सरारंभमासाच्या आपल्या श्री. श्रीसाईलीलेच्या नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या अंकांत आपल्या स्नेह्याच्या कारखान्यातील श्रीयुत भिमा हेड जाबर नावांच्या एका श्रीज्ञानेश्वरीभक्तानें श्रीज्ञानेश्वरींत "**सतरावियेचें** वर्णन केलें आहे ती सतरावी काय आहे," म्हणून आपल्या स्नेह्यास एक मार्मिक पृच्छा केली आहे, व तो उभयतांचा मननीय संवाद आपण "अनुभव" या शीर्षकाखालीं छापून प्रसिद्ध केला आहे. ज्ञानेश्वरी-सद्भक्त-वाचकांस त्या प्रश्नाचें यथायोग्य उत्तर देऊन त्यांचें समाधान करून देण्याची माझी पात्रता नाहीं तथापि त्यासंबंधानें माझी असलेली अल्प समजूत मी या लेखरूपानें आपल्याकडे पाठवीत आहें. तीस श्रीसाईलीलेच्या येत्या अंकीं स्थल द्यावें, अशी नम्र विनंती आहे.

### श्रीज्ञानेश्वरींतील सतरावी (कला) व श्रीसमर्थ सद्गुरु साईबाबांचें भक्त भ्रूकुटिद्वय मध्यभागीं स्वहस्तें उदी विलेपन

श्रीज्ञानेश्वरींत "सतरावी" चें अनुसंधान (संबंध) तीन ठिकाणीं आढळतें.

**प्रथम स्थल:**—तंव वरिलेकडोनि ढाळें। **चंद्रामृताचें तळें।**
कानवडोनि मिळें। शक्ति मुखीं ॥ २४७ ॥
या स्थलीं "चंद्रामृताचें तळें" म्हणजे अ–६ सतरावीच.

**द्वितीय स्थल:**—तेथ उल्हाट शक्तीचेनि उजिवडें।
मन पवनाचेनि सुरवाडें।
सतरावियेचें पाणियाडें।
बळियाविलें ॥ २१४ ॥ अ. ९.

**तृतीय स्थलः—** सतरावियेचें स्तन्य देसी ।
अनाहताचा हलरू गासी ।
समाधि बोधें निजविसी ।
बुझाऊनि ॥ ७ ॥ अध्याय १२.

ही " सतरावी " म्हणजे सतरावी कला. ही चंद्राची कला नव्हे. चंद्रास कलानिधि असें नांव आहे. परंतु त्याचेजवळ फक्त सोळाच कला आहेत. तो दर पौर्णिमेस षोडश कलांनीं युक्त असतो. म्हणजे शुद्ध प्रतिपदे-पासून पौर्णिमेपर्यंत प्रति दिवशीं एकेक जास्त याप्रमाणें पंधरा कलांनीं वृद्धिं. गत हरून त्याची स्वतःची एक मिळून सोळा कलांनीं युक्त होतो, व त्यास पूर्णचंद्र असें म्हणतात. तो सतरा कलांनीं केव्हांही युक्त नसतो.

प्रख्यात चौदा विद्या व चौसष्ट कला यांपैकींही ज्ञानेश्वरींतील " सत-रावी " कला नव्हे.

ज्ञानेश्वरींत सतराव्या कलेचें दिग्दर्शन केलें आहे. पण तत्पूर्वींच्या सोळा कला कोठें तरी असल्याच पाहिजेत व त्यांची माहिती मिळाल्याखेरीज सत-राव्या कलेचें महत्त्व कळणार नाहीं. म्हणून प्रथम सोळा कलांची माहिती देऊन नंतर सतरावीकडे वळतों.

ज्ञानेश्वरींतील " सतरावी " कला व तत्पूर्वींच्या सोळा कला प्रत्येक स्त्रीपुरुष मानव शरिरात नैसर्गिकच असतात. परंतु ब्रह्मनिष्ठ ज्ञानी किंवा योगी यांच्या शिवाय या सतरा कलांचें ज्ञान इतर जनास क्वचित्‌च असतें.

अर्थवर्ण वेदांतर्गत प्रश्नोपनिषदांत भगवान् श्रीपिप्पलाद ऋषींना, पर-ब्रह्माचा शोध लावण्याकरितां आलेल्या कबधी-कात्यायनादि ज्या ब्रह्मपर व ब्रह्मनिष्ठ अशा सहा विद्वान् ब्राम्हण मुमुक्षु शिष्यवृंदांनीं प्रत्येकीं एक या-प्रमाणें सहा प्रश्न केले त्यांतील सुकेशा नामक शिष्याचा असा प्रश्न होता कीं, " हे भगवान्, कोसल देशाचा राजपुत्र हिरण्यनाभ एके दिवशीं मजकडे आला व म्हणाला कीं सोळा कलांचा पुरुष तुला माहीत आहे का ? मी म्हणालो

'नाहीं.' तो परत गेला. तरी असा पुरुष कोठें आहे हें आपण मला कृपा करून सांगावें."

शिष्यवत्सल करुणाकर पिप्पलादाचार्यांनी सांगितलें कीं, "हे शिष्योत्तमा, ज्याच्यामध्यें षोडशकलांचा उद्भव होतो तो पुरुष येथेंच आपल्या अंतःकरणरूपी शरीरांत वास्तव्य करतो. तो पुरुष म्हणजे आत्माच. त्या पुरुषानें प्रथम या शरीरांत प्राण (हिरण्यगर्भ) उत्पन्न केला. नंतर प्राणापासून शुभाशुभ कर्म करण्याची इच्छा देणारी श्रद्धा उत्पन्न झाली. श्रद्धेनुसार शुभाशुभ कर्म करण्याकरितां जरूर लागणारी आकाश, वायु, तेज, जल, पृथ्वी हीं पंचमहाभूतें, पंचमहाभूतात्मक इंद्रियें ( पंच ज्ञानेंद्रियें व पंच कर्मेंद्रियें ) मन ( अंतःकरणचतुष्टय ) हीं निर्माण झालीं. नंतर ह्या पुरुषानें प्राणांचें संरक्षण करण्याकरितां अन्न ( म्हणजे उपभोगाचे पंचमहाभूतात्मक पदार्थ ) निर्माण केलें. अन्नापासून वीर्य म्हणजे सामर्थ्य उत्पन्न झालें. परमात्म वस्तु प्राप्त करून घेण्याकरतां चित्त शुद्धिसाठीं तप निर्माण केलें. तपामुळें वेदमंत्र निर्माण झाले, मंत्रापासून अग्निहोत्रादि कर्में निर्माण झालीं. व कर्मफल म्हणून चतुर्दश लोक ( भुवनें ) व भुवनांतील अनंत नामरूपें, निर्माण झालीं, ह्याप्रमाणें त्या पुरुषानें सोळा कला निर्माण केल्या, म्हणजे मानवप्राणी हा षोडश कलायुक्त पुरुष झाला.

प्रश्नोपनिषद् पान २०१,२०२ गानूकृत.

पातंजल सूत्र पान १२७ नानाभाई सदानंद रेळेप्रकाशित.

ज्याप्रमाणें सागराच्या पाण्याची सूर्याच्या प्रखर ऊष्णतेनें वाफ बनून अंतरालांत तिचे मेघ बनतात, व नंतर तेच मेघ मेदिनीतलावर जलाचा वर्षाव करून सरित्प्रवाह जलमय करून सोडतात व त्या सरित्प्रवाहाची प्रवृत्ति निरंतर सागराकडे जाण्याची असून सागररूप होण्याची असते, तद्वत् पुरुषानें निर्माण केलेल्या उपरिनिर्दिष्ट प्राणादि षोडश कलांची प्रवृत्ति पुन्हा पुरुषाकडे जाऊन पुरुषरूप होण्याकडे असते. म्हणजे ह्या कलांची पुरुषास जी एक प्रकारची

[illegible] असतां ही या कला [illegible] कुंडलिनीच्या प्रसादानें आज्ञा चक्रांत त्याच्या ठिकाणीं लय पावल्या, म्हणजे तो उपाधिरहित होऊन निष्कल होतो. [illegible]ना गोळीस [illegible] लागतें. योगाभ्यासानें ह्या सोळा कला ज्या एका दिव्य कलेंत लीन होतात तीच सतरावी कला. ही दिव्य कला म्हणजेच तो निष्कल पुरुष, [illegible]त्मा, या कलेसच भगवान ज्ञानेश्वर महाराजांच्या प्रसिद्ध हरि-पाठांतील ( श्री [illegible]गुळोबा [illegible]गकृत ) ११ व्या पानावरील आठवे. अभंगांतील चतुर्थ पादांत " [illegible]नकला " असें म्हटलें आहे, व तिलाच [illegible] सूत्रांत ८४ पानावर खेचरी मुद्रेच्या वर्णनांत " सोमकला " " अमरकला " असें म्हटले आहे, तिलाच योगवासिष्ठांतर्गत श्रीचूडालाख्यानांत ११ व्या शतकांत (श्रीहंसराजकृत) " सप्तदशकलात्मक जीव " किंवा " सूत्रात्मा " असें म्हटलें आहे.

आतां ही सतरावी कला योगीजन कशी प्राप्त करून घेतात व प्राप्त झाली असतां योग्यास कोणतें फल प्राप्त होतें याचें थोडेंसें वर्णन देतों.

ही कला हठयोगावांचून प्राप्त होत नाहीं. " ह " म्हणजे सूर्य व " ठ " म्हणजे चंद्र. सूर्य व चंद्र जेथें एकत्र होतात त्याला हठयोग म्हणतात. तालूच्या मुळाशीं दिव्य रूप चंद्रमा आहे. त्यांतून अहोरात्र अमृतस्राव होत असतो. त्याचा नाभिस्थ अग्निरूपी सूर्य निरंतर ग्रास करतो, म्हणजे गिळून टाकतो. त्यामुळें मनुष्यास त्याच्या शरीरांत असलेल्या अमृताचा लाभ मिळत नाहीं म्हणून त्यास जरा किंवा वृद्धावस्था प्राप्त होते.

ह्या कलेचें स्थान प्रत्येक मानव प्राण्याच्या ललाटांत दोन्ही भुवयांच्या मध्यें " हं क्षं " या दोन अक्षरांनीं अंकित अशा दोन पाकळयांनीं युक्त असें जें चक्र आहे व ज्या चक्राला व्योम किंवा आकाश किंवा आज्ञाचक्र किंवा बिंदुस्थान किंवा अमृतबिंदुस्थान अथवा चंद्रामृत बिंदुस्थान अथवा चंद्रामृत तलाव असें म्हणतात, त्यांत आहे.

चक्र म्हणजे सुषुम्नानाडीबरोबर संबद्ध झालेले एका प्रकारचे शिराग्रंथी. या ग्रंथींनाच पद्में किंवा कमलें म्हणतात, व या ग्रंथींचे जे सूक्ष्म शिरातंतु त्यांना दल किंवा पाकळया असें म्हणतात.

गुद आणि लिंग या दोहोंच्या मध्यभागांत मूलकंद आहे. तेथें " वं शं षं सं " या चार वर्णांनीं चिन्हित अशा चार पाकळ्यांनीं युक्त अग्निवर्णासारखें भगाकृति असें "**आधारचक्र**" आहे. या चक्रांत ज्योतिष्मती कुंडलिनी असते.

दुसरें—लिंगाच्या पश्चिमभागीं गुह्यदेशांत " बं भं मं यं रं लं " या सहा वर्णांनीं चिन्हित अशा सहा पाकळयांनीं युक्त सूर्यवर्ण समान व पोंवळयाच्या अणकुचीप्रयाणें असें "**स्वाधिष्ठानचक्र**" आहे.

तिसरें—नाभिप्रदेशांत " डं ढं णं तं थं दं धं नं पं फं " या दहा वर्णांनीं अंकित अशा दश दलांनीं युक्त रक्तवर्ण असें "**मणिपूरचक्र**" आहे.

चवथें—हृदयप्रदेशांत " कं खं गं घं ङं चं छं जं झं ञं टं ठं " या द्वादशवर्णांनीं चिन्हित असें द्वादळदलयुक्त सुवर्णवर्ण अधोमुख केलेलें असें "**अनाहतचक्र**" आहे.

पांचवें—कंठदेशांत " अ आ इ ई उ ऊ ऋ ॠ ऌ ॡ ए ऐ ओ औ अं अः " या षोडशवर्णांनीं अंकित असें षोडशदलयुक्त चंद्रवर्णसमान असें "**विशुद्धिचक्र**" आहे. त्याच्या डाव्या बाजूस "**इडा**" व उजव्या बाजूस "**पिंगला**" आणि मध्यभागी "**सुषुम्ना**" अशा तिन नाडया आहेत. आपले शरीरांत एकंदर प्रधान, शाखा व प्रतिशाखा मिळून ७२७२१०२०१ इतक्या, नाडया आहेत. यांपैकी प्रधान नाडया १०१ आहेत व त्यांत वरील तीन नाडया श्रेष्ठ असून योगमार्गास अत्यंत अनुकूल व उपयुक्त अशा आहेत.

सहावें—दोन्ही भुवईच्यामध्यें " हं आणि क्षं " या दोन वर्णांनीं चिन्हित असें द्विदलयुक्त रक्तवर्ण असें "**आज्ञाचक्र**" आहे व यांतच चंद्रामृताचा तलाव आहे.

सातवें—तालूच्या जवळ " **तालुकाचक्र** " ज्याला घंटिकास्थान असें म्हणतात, व जें दशमद्वाराचा मार्ग आहे तें आहे. या तालुकाचक्रास जें सुईच्या अग्राप्रमाणें अती सूक्ष्म रंध्र आहे तेंच दशमद्वार मार्ग आहे. या रंध्रास **निर्वाणसूचक ब्रह्मरंध्र** असें म्हणतात.

आठवें—वरील दशम द्वारांत ( या देहरूपी पूरांत जीं मलमूत्रविसर्जनाचीं दोन, नाभि, मुख, नासिका कर्णद्वय नेत्रद्वय याप्रमाणें नऊ द्वारें आहेत त्यानंतरचें हें दशमद्वार. ) सहस्रदल युक्त, स्फटिकवर्णासमान असें " **ब्रह्मचक्र** " आहे. त्यांत ज्ञानस्वरूप सच्चिदानंद परमात्मा स्थित आहे.

हा परमात्म पदाची प्राप्ति सतराव्या कलेच्या प्राप्तीनें होते, व सतराव्या कलेची प्राप्ति भगवती कुंडलिनीच्या प्रसादानें होते.

भगवती श्रीज्ञानेश्वरीच्या ६ व्या अध्यायातील १४ व १५ श्लोकभाष्यांत भगवान श्रीज्ञानेश्वरमहाराजांनीं हठयोग वर्णनांत या सतराव्या कलेचें भरपूर, सुश्राव्य, सुगम, सुंदर, रसभरित चित्ताकर्षक असें अत्युत्तम वर्णन केलें आहे.

जसें जामदारखान्यांतील किंवा भांडारगृहांतील अमोलिक वस्तु हस्तगत करून घेण्यास त्याचें कुलुप किल्लीनें उघडावें लागतें तशी ब्रह्मचक्र रूपी भांडारगृहांतील अमोलिक सच्चिदानंदरूपी परमात्मवस्तु हस्तगत करून घेण्यास त्या भांडार गृहास जी सतरावी कलारूपी कुलूप आहे तें उघडण्यास भगवती कुंडलिनी ही किल्ली ( चावी ) आहे. योग्यांचा सर्व आधार या जगदंबा कुंडलिनीवर आहे.

या कुंडलिनी देवीस कुटिलांगी, भुजंगी, शक्ती, ईश्वरी, कुंडली व अरुंधती अशीं निरनिराळीं नांवें आहेत.

वर सांगितलेंच आहे कीं, मूलकंदांत जें आधार चक्र आहे तें कुंडलिनीमाईचें वसतिस्थान आहे. तेथें ती आपलें मुख पसरून निजलेली असते.

आधारचक्राच्या मूळ स्थानापासून मूलकंद शिस्नाच्या वर व नाभीच्या खालीं एक वीत उंच आहे. त्याचा चार बोटें विस्तार आहे. तो मृदु, श्वेतवर्ण, व अंडाकृति असा आहे. तो कंद वज्रासन करून पायाच्या घोटयांनीं (खोटांनीं)

दाबावयाचा, व कुंभक करून नाभिस्थ सूर्याचें आकुंचन करावयाचें. असें केल्यानें देवी कुंडलिनी जागृत होते.

पायापासून गुडघ्यापर्यंत पार्थिवतत्वाचें स्थान आहे. गुडघ्यापासून गुदद्वारापर्यंत जळतत्वाचें स्थान आहे. गुदद्वारापासून हृदयापर्यंत तेजतत्वाचें स्थान आहे. हृदयापासून दोन्ही भृकुटींच्या मध्य देशापर्यंत वायुतत्वाचें स्थान आहे आणि भृकुटि मध्यप्रदेशापासून ब्रह्मरंध्रापर्यंत आकाशतत्वाचें स्थान आहे.

वज्रासनामुळें जागृत झालेल्या कुंडलिनी जयदंबेच्या प्रसादानें, योगी आधारचक्रापासून पृथ्वी, आप व तेज या तत्वांचा ग्रास करीत करीत, स्वाधिष्ठान, मणिपूर, अनाहत व विशुद्धिचक्रापर्यंत अपान, समान व प्राण यांना बरोबर घेऊन सुषुम्ना मार्गानें पूर्वी राहिलेल्या दूषित वासनेनें प्रकट केलेल्या प्राणांत सोळा कलांचा आज्ञाचक्रांत लय करून येथील चंद्रामृत खाणाऱ्या नाभिस्थ सूर्यास कुंडलिनीच्या साहाय्यानें येथें खेंचित आणून त्याचा व चंद्राचा [illegible] करून, कुंडलिनीनें मिळून पान केलेल्या [illegible] चंद्रामृतानें [illegible] पान करतो. व त्या योगें तो येथें शांतचित्त होऊन सतरावी जी जीवनकला म्हणजे अमृत किंवा अमरकला तिची प्राप्ती करून घेतो. त्यायोगें त्याला जरा किंवा वृद्धावस्था न येतां तो तेजःपुंज, सुवर्णकांति, कृष्णकुंतल, रत्नप्रभदंत या अखंड तारुण्यावस्थेनें युक्त होऊन आकाशतत्वांत मिळून जाण्याकरितां दशमद्वार जें तालुकाचक्र त्यांतून ब्रह्मरंध्रांत प्रवेश करून सच्चिदानंदपद प्राप्त करून घेतो.

आतां श्रीसमर्थ सद्गुरु साईबाबा आपणां सर्व भक्त लेंकरांस ते हयात असतां स्वतः आपल्या हातानें ज्या विवक्षित तऱ्हेनें श्रीभगवती उदीमाई लावीत असत ती तऱ्हा सर्वांना स्मरत असेल असें नाहीं. किंबहुना त्या तऱ्हेकडे कोणी लक्ष दिलें असेल किंवा नाहीं याची शंकाच वाटते, व कदाचित त्या तऱ्हेचें स्मरण असल्यास बाबा उदी कोठें, कशी व काय करणानें लावीत असत याच्या कारणाचा शोध कोणी क्वचितच केला असेल. मला स्वतःला त्या विवक्षित पद्धतीची आठवण होती पण हा कालपर्यंत त्याचें कारण मात्र माझ्या लक्षांत आलें नव्हतें. हें कारण आज सुचण्यास माझे सन्माननीय

विद्वान पदवीधर भक्तश्रेष्ठ "म्हातारा" या सहीने श्रीसाइलीलेंत झळकणारे पुराणपुरुष मित्र श्रीयुत रामचंद्र आत्माराम ऊर्फ बाबासाहेब तर्खड हे कारणीभूत झाले, व यांबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी आहें.

बाबा नेहमी हातांत उदी घेऊन ती ज्यास लावावयाची त्याच्या दोन्ही भुवईच्या मध्य प्रदेशावर म्हणजे उपरिनिर्दिष्ट जें सतराव्या कलेचें स्थान आहे त्यावर आपल्या उजव्या हाताच्या अंगठ्यानें ठेवून तो अंगठा त्या ठिकाणीं चांगला जोरानें दाबीत, व बाकीचीं चार बोटें त्याच्या मस्तकावर ठेवीत, व त्या योगें असें ध्वनित करीत कीं, माझ्या उदीमाईवर दृढ श्रद्धा ठेवा म्हणजे ही तुमचे शरीरांतील पृथ्वी आप व तेज या तिन्ही तत्वांचा ग्रास करून तुम्हांस भृकुटिमध्यांत असलेल्या चंद्रामृताचें पान करवून त्या ठिकाणीं असलेल्या आज्ञाचक्रांत प्राणादि सोळा कलांचा लय करवील व सतराव्या जीवन किंवा अमृतकलेची प्राप्ती करून देऊन अभय करून परमात्मप्राप्ती करून देईल.

दक्षिणा मागून घेण्यांत जरी आपल्या भक्तांस जन्ममरणांतून मुक्त करण्याचा श्रीसाईमाउलीचा उदात्त हेतु, तसाच विवक्षित ठिकाणीं, विवक्षित हातच्या विवक्षित बोटानें उदी लावून विवक्षित बोटें मस्तकावर ठेवून सतराव्या कलेची व नंतर सच्चिदानंद परमात्मपदाची प्राप्ती करून देण्याचा तिचा गूढ व निष्काम हेतुच असला पाहिजे.

यावरून श्रीसाईमाउलीचा प्रत्येक शब्द, तिची प्रत्येक लीला, तिचें प्रत्येक कृत्य व्यावहारिक व पारमार्थिक शिकवणुकीचें असून अज्ञांनी भक्तजनांच्या कष्टमय संसारास सुगमता व माधुर्य आणण्याचें होतें, असें सूक्ष्म विचाराअंती सर्वांस कळून आल्याखेरीज राहणार नाहीं. तिनें आपणां सर्वांवर असंख्य उपकार करून आपणास अनंत जन्मांचे ऋणी करून ठेविलें आहे.

जेथें जेथें उदी, रक्षा अगर अंगारा लावण्याची चाल आहे तेथे तेथें ती कपाळावरच फांसण्यांत येते. भक्ताच्या भृकुटिमध्यांत विवक्षित रीतीनें उदी लावतांना फक्त योगेश्वर बाबांनाच पाहण्यांत आलें आहे.

---

१ "देवा"! "अशी कशी रे तुझी थट्टा। भल्याभल्यांसि लाविला बट्टा!"
—संपादक.

बाबांची दक्षिणा-याचना, उदीविलेपन, श्रद्धा व काळधीरता ( सबुरी ) आदीकरून प्रत्येक गोष्ट अगर कृत्य म्हणजे भगवती ज्ञानेश्वरींतील त्या त्या ओंवीबद्ध विषयांच्या सांकेतिक खुणाच होत, व ज्ञानेश्वरींतील ओंव्या म्हणजे वेदमंत्रच आहेत.

दक्षिणा व उदीविलेपन हे विषय जसे ज्ञानेश्वरींत निराळ्या स्वरूपानें आले आहेत तसाच बाबांची " श्रद्धा व सबुरी " हाही विषय ज्ञानेश्वरींत अति मार्मिकपणानें व अत्यंत विस्तृत रीतीनें आला आहे. यावरून बाबांचें ज्ञानेश्वरांशीं किती तादात्म्य होतें हें सहज कळून येतें.

" श्रद्धा व सबूरी " याबद्दल पुढें यथावसर विस्तृत लिहिणार आहे; म्हणून आतां त्याबद्दल जास्त लिहीत नाहीं.

अशा भगवती जगदंबा विश्वमोहिनी साईमाउलीस पुनरपि सगुण स्वरूपांत याच जन्मीं, याच डोळ्यांनीं जागृतींत पाहाण्याचा व याच जीर्ण झालेल्या शरीरांनीं तिची सेवा करण्याचा सुयोग येईल का ? मजसारख्या हीनभाग्य पामराजवळ तरी येवढी पुण्याईची कमाई खात्रीनें नाहीं. मग निराशेच्या किरणांनीं ही ग्रासून टाकलेली सदाशा कधीं कधीं मनःपटलावर विद्युत्प्रवाहाप्रमाणें मध्येंच चमकून पुनरपि कां अदृश्य होते बरें ? असो. याचें कारण त्या जगज्जननीसच माहीत. तिलाच केव्हां दया येईल तो सुदिन ! तो सुवर्णदिन ! तो अनर्घ्य रत्नदिन ! तो परम भाग्य रविउदय दिन !

असो. हें लिहितांना बाबांच्या प्रत्यक्ष व स्वप्नदृष्टांतरूपानें त्यांनीं हयात असतांना व निजधामास गेल्यानंतर दिलेल्या बहुमोल व्यावहारी व पारमार्थिक शिकवणुकीची व कांहीं तात्कालिक व कांहीं कालांनंतरच्या प्रत्यक्ष आलेल्या अनुभवाची जेव्हां पुण्य व मधुर स्मृति होते तेव्हां मला अत्यानंद होतो, व माझें अंतःकरण क्षणभर अष्टसात्विक भावांनीं उचंबळून आल्याखेरीज राहात नाहीं. अशा विश्वात्ममाउलीची शब्दांनीं स्तुति करण्यापेक्षा मौनानें करावी हेंच उचित.

शेवटीं हें दशदलरूपी वाक्सुमन त्या समर्थ सद्गुरु साईमाउलीचे दिव्यांघ्रिजलजांवर अनन्यभावानें अर्पण करून ह्या दासानुदासाकडून सर्व आयुष्यभर अखंड सेवा घ्यावी, अशी अंतिंची एकवार नम्रता व अनंत प्रणिपातपूर्वक प्रार्थना करून व पुन्हा एकवार आपले आभार मानून आपली रजा घेतों.

ठाणें,
२–४–३२
गुरुवार.

बाबांचें बाळ.

## ॥ श्रीसद्गुरु साईनाथ प्रसन्न ॥

श्रीयुत रा. रा. बाबासाहेब तर्खड, साईलीला प्रकाशक यांस—

वि. वि. मी श्री साईलीलेचा वर्गणीदार आहें व त्या साईलीलेच्या एका अंकांत एका भक्तानें लिहिल्याप्रमाणें बाबांचे चरणांजवळ दिडकी–दुगाणी जमा करून दोनशें रुपये आपल्याजवळ हजर केले आहेत, हे आपण घेऊन भक्तमंडळांत ९०, कायम फंडांत ८५, मिळून १७५ जमा करून बाकी २५ रुपये दुसऱ्या कुठल्या तरी बाबांच्या फंडांत आपल्या इच्छेप्रमाणें जमा करावे व त्याबद्दल येत्या महिन्याच्या श्री साईलीलेच्या अंकांत भक्तमंडळास समजण्याकरितां प्रसिद्ध करावें,

पूर्वी काकासाहेब दीक्षित यांचेमार्फत प्रत्येक वरील फंडांत १० प्रमाणें (२०), श्री. आण्णासाहेब दाभोळकरमार्फत प्रत्येक फंडांत २५ प्रमाणें (५०), व आपलेमार्फत कायम फंडांत ५ याप्रमाणें जमा जाहलेले असावेसें वाटतें. येत्या गुरुपौर्णिमेच्या उत्सवाप्रीत्यर्थ अडीच रुपये, व पुण्यतिथी आश्विन शु. १० च्या उत्सवाप्रीत्यर्थ ५ रु. याप्रमाणें साडेसात रुपये दुसरे देत आहें. वरील लिहिण्याचा आपल्यास राग येत असल्यास आपल्या इच्छेप्रमाणें करण्यासही माझी हरकत नाहीं. ९ व्या वर्षाचा अंक अजून मिळाला नाहीं. सवडीनें

पाठवावा. माझा छलींचा पत्ता दीक्षित सॉलिसिटर यांच्या बंगल्यांत असल्याचें आपल्यास समक्ष कळविलेंच आहे.

आपला गरीब सेवक,

**दत्तात्रय मोरेश्वर सबनीस.**

श्री. दत्तात्रय मोरेश्वर सबनीस यांनी आजपर्यंत खालील खात्यांत येणें-प्रमाणें रकमा भरल्या आहेत.

| | |
|---|---|
| श्रीभक्तमंडळ खाते | रु. १२५—०—० |
| श्रीकायमफंड खातें | ,, १५०—०—० |
| श्रीगु. पौर्णिमा (१८५४) खातें | ,, २—८—० |
| श्रीपुण्यतिथी (१८५४) खातें | ,, ७—८—० |

**रा. आ. तर्खड,**

आ. खजिनदार,

**श्रीसाईबाबा शिरडी संस्थान.**

श्रीसाईलीलेचा चैत्र महिन्याचा अंक श्री. सबनीस यांना त्यांच्या सांगितलेल्याच्या पत्त्यावर टपालांतून पाठविण्यांत आला होता; तो त्यांना न मिळाल्या-मुळें एक प्रत समक्ष देण्यांत आली.

**रा. आ. तर्खड**

संपादक श्रीसाईलीला

## वर्गणीदारांकरितां

१ श्रीसाईलीलेचा वर्षारंभ चैत्र महिन्याचे अंकापासून आहे. नवे वर्गणीदारास वर्षारंभापासून अंक घ्यावे लागतील.

२ पत्ता बदलणें झाल्यास लगेच आम्हांस कळवावें. बदललेला प- न कळविल्यामुळें कित्येक वेळां अंक गहाळ होतात.

३ वर्गणीदारांसंबंधी पत्रव्यवहार व्यवस्थापकाकडे करावा.

४ लेखासंबंधी पत्रव्यवहार संपादक व प्रकाशकांकडे करावा

## वार्षिक वर्गणी.

वार्षिक वर्गणी टपाल खर्चासह मनिऑर्डरनें अगाऊ रु. ३।=, व्ही. पी. नें रु. ३॥, फुटकळ अंक ।= मागील अंकास शिल्लक असल्यास ॥

व्यवस्थापक—**श्रीसाईलीला.**

## लेखकांकरिता

१. श्रीसाईलीलेंत प्रसिद्धीसाठीं पाठविलेला लेख अथवा कविता का- दाच्या एका बाजूवर, मार्जिन सोडून, सुवाच्य बाळबोध लिपींत असावी. पेन्सिल किंवा कागदाचे दोन्हीं बाजूस लिहिलेला मजकूर छापण्यास फार त्रास पड

२. लिखाणासोबत पूर्ण नांव व पत्ता दिला पाहिजे. नांव प्रसि- न करितां टोपण. नांवाखालीं प्रसिद्धि द्यावयाची असल्यास त्याप्रमाणें कळवा

३. लेख अथवा कविता हातीं आल्यानंतर १ महिन्यांत पस- अगर नापसंति कळविली जाईल. पसंति कळविल्यानंतर, आम्हांला क- विल्याशिवाय लेखकांनीं तो मजकूर दुसरीकडे छापविण्यास देऊं नये.

४. लेखांत योग्य तो फेरफार करण्याचा अधिकार आमचेक राहील. येईल तसा शब्दशः प्रसिद्ध करण्याची हमी आम्हीं घेत ना

५. लेखासोबत पुरेसें पोस्टेज आल्यास, नापसंत लेख परत करूं.

प्रकाशक—**श्रीसाईलीला.**